# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक२००७/((२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ च्या महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०१९ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, काम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४

E-mail :

development.section@unigug.ac.in


गो.वि./म.वि.वि.वि./722/२०२३

दिनांक: १५/०२/२०२३ 29/05/2023

## परिपत्रक

विषयः— ''अकृषि विद्यापीठे व त्याअंतर्गत महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती'' या कार्यक्रमांतर्गत राबवावयाचे उपक्रम.

संदर्भः— उच्च व तंत्रशिक्षण विगाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. पौतृव—२०२३/प्र.क्र.३७/आस्था—२, दिनांक ११मे, २०२३.

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२३ हे वर्ष ''आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष'' म्हणून घोषित केले आहे. त्या अनुषंगाने राज्यातील तृणधान्य पिकांचे उत्पादन वाढविणे तसेच सदर पिकांच्या पोषण मूल्यांबाबत लोकांमध्ये जनजागृती करुन आहारातील वापर वाढविणेबाबत प्रचार व प्रसिध्दी करणे या बाबी राबविण्यासाठी ''महाराष्ट्र श्री अन्न (पौष्टिक तृणधान्य) अभियान'' राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. राज्यातील कृषितर विद्यापीठे व या विद्यापीठांतर्गत कार्यरत असणारी शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनुदानित महाविद्यालय व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील व आरोगयासाठीचे महत्व अधोरेखित करण्याकरीता सन २०२३ या वर्षामध्ये ''अकृषि विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती'' या कार्यक्रमांतर्गत संलग्नित पत्रातील उल्लेखीत ८ उपक्रम राबविण्यास कळविलेले आहे. तसेच जुलै ते ऑगस्ट, सप्टेंबर ते ऑक्टोबर व नोव्हेंबर ते डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा कार्यवाहीचा विद्यापीठनिहाय अहवाल अनुक्रमे माहे सप्टेंबर, नोव्हेंबर व जानेवारी २०२४ या महिन्यांच्या १० तारखपूर्वी शासनास सादर करावयाचे आहे.

करीता संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपल्या महाविद्यालय स्तरावरुन योग्य ती कार्यवाही घेवून त्यासंबधीत अहवाल विद्यापीठास सादर करावे.

सहपत्र : संदर्भ पत्र.

(डॉ. अनिल हिरेखण)<br>
कुलसचिव ,<br>
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,<br>
सर्व संलग्नित महाविद्यालये<br>
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:—

१) मा. कुलगुरू महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र—कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिव यांचे कार्यालय
आवक क्र. 4195 दि. 16/5/23

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 1055 दिनांक 16/5/23
जावक क्र. ........ दिनांक ........

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२८२०३०४ ई-मेल- ds.sashi-hted@mah.gov.in

---

क्रमांक:पौतृव-२०२३/प्र.क्र.३७/आस्था-२ दिनांक ११ मे, २०२३

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे,
समूह विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

२) संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) संचालक (तंत्रशिक्षण), एलफिस्टन तंत्रशिक्षण विद्यालय आवार,
महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.

SPEED POST

विषय:- "अकृषि विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती" या कार्यक्रमांतर्गत राबवावयाचे उपक्रम.

महोदय,

संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२३ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष" म्हणून घोषित केले आहे. त्या अनुषंगाने राज्यातील तृणधान्य पिकांचे उत्पादन वाढविणे तसेच सदर पिकांच्या पोषण मूल्यांबाबत लोकांमध्ये जनजागृती करुन आहारातील वापर वाढविणेबाबत प्रचार व प्रसिध्दी करणे या बाबी राबविण्यासाठी "महाराष्ट्र श्री अन्न (पौष्टिक तृणधान्य) अभियान" राज्यामध्ये राबविण्यात येत आहे.

२. "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष" च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या सूचनांनुसार शासनाच्या कृषि विभागाबरोबरच अन्य विभागांनीही पौष्टिक तृणधान्य पिकांचा विकास व जनतेच्या आहारामध्ये पौष्टिक तृणधान्याचा समावेश वाढविण्याबाबत उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

D.R.C College
16/5/2023

श्री राऊत
कार्यवाही द्यावी
17/5/23

३. ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, वरई, कोदो, कुटकी, सहावा, राजगिरा यासारखी पौष्टिक तृणधान्य ही कर्बोदके, तंतुमय पदांर्थ, प्रर्थिने, जीवनसत्वे व खनिजांनी समृध्द आहेत. पौष्टिक तृणधान्यामध्ये कॅलशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, लोह इत्यादी खनिजे मुबलक प्रमाणात असतात. पौष्टिक तृणधान्य ही पचनास हलकी असतात. अलिकडील काळात युवकांच्या आहारामध्ये पौष्टिक तृणधान्यांचा वापर कमी होत आहे. बदलत्या जीवनशैलीमध्ये युवकांचे आरोग्य सुस्थितीत राहावे याकरिता त्यांच्यामध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृकता निर्माण करणे आवश्यक आहे.

४. राज्यातील कृषितर विद्यापीठे व या विद्यापीठांतर्गत कार्यरत असणारी शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनुदानित महाविद्यालय व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील व आरोग्यासाठीचे महत्त्व अधोरेखित करण्याकरिता सन २०२३ या वर्षामध्ये "अकृषि विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती" या कार्यक्रमांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१) हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयामध्ये तृणधान्यांच्या पाककृती संदर्भात जागृकता/प्रचार प्रसार यांचा अंतर्भाव करणे.

२) विद्यापीठे व महाविद्यालयातील वस्तीगृहांच्या भोजनालयामध्ये पौष्टिक तृणधान्यांचा वापर करणे.

३) विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अध्यापक व विद्यार्थ्यांकरिता "पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील महत्व" या विषयावर स्थानिक पातळीवरील आहारतज्ञांची / डॉक्टरांची / गृह विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करणे.

४) विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक तृणधान्यांच्या आहारातील महत्वाच्या अनुषंगाने तृणधान्यांच्या पाककृतीच्या स्पर्धांचे आयोजन करणे.

५) विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अस्तित्वात असलेल्या कलापथकांमार्फत पौष्टिक तृणधान्याच्या वापराबाबत पथनाटय सादर करणे.

६) राष्ट्रीय सेवा योजनांच्या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधान्यांची ओळख होण्याच्या अनुषंगाने नजीकच्या परिसरात क्षेत्रभेटी आयोजित करणे. सदर उपक्रमा दरम्यान पौष्टिक तृणधान्यांचे आरोग्यातील महत्व या विषयी आहारतज्ञांचे च्या व्याख्यानांचे आयोजन करणे.

७) विद्यापीठे व महाविद्यालयांच्या परिसरामध्ये सूचना फलकांमध्ये किंवा अन्य योग्य ठिकाणी पौष्टिक तृणधान्यांच्या आहारातील महत्वा विषयीचे वर्तमानपत्रातील /मासिकांमधील लेख प्रदर्शित करणे.

८) पौष्टिक तृणधान्यांचे बियाणे त्यांच्या शास्त्रीय व स्थानिक नावांसह तसेच त्यांचे पोषण मूल्य व आहारातील महत्व याच्या तपशिलासह विद्यापीठे व महाविद्यालयांच्या दर्शनी भागामध्ये ठेवावेत.

५. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ निमित्त सन २०२३ या वर्षामध्ये "अकृषि विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती" या कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये उपरोक्त उपक्रम राबविण्यात यावेत. तसेच जै ते ऑगस्ट, सप्टेंबर ते ऑक्टोबर व नोव्हेंबर ते डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा कार्यवाहीचा विद्यापीठनिहाय अहवाल अनुक्रमे माहे सप्टेंबर, नोव्हेंबर व जानेवारी २०२४ या महिन्यांच्या १० तारखेपूर्वी शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

(अशोक मांडे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव :-

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबईख्.
२) मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) उप सचिव (विशि) उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६) उप सचिव (मशि) उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) उप सचिव (तांशि) उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) कक्ष अधिकारी (आस्था-२), उच्च व तंत्रशिक्षण (निवडनस्ती)